# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः23.08.2024** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

- पोलंडच्या दौऱ्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून महायुद्ध कालीन आठवणींना उजाळा
- पंतप्रधान जळगाव मध्ये येत्या रविवारी 11 लाख लखपती दादींना प्रमाणपत्रं वितरित करणार
- बदला पूर प्रकरणी प्रतिज्ञा पत्र सादर करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

आणि

- एमपीएससीची राजपत्रित अधिकारी संयुक्त पूर्वपरीक्षा लांबणीवर

**Intro**

**पंतप्रधान-सह्याद्री**

भारत आणि पोलं नं परस्परां बरोबरचे संबंध धोरणात्मक भागीदारी त परिवर्तित करण्याचा निर्णय घेतल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पोलंड च्या दौऱ्यादरम्यान पंतप्रधानांनी वॉर्सा इथं पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्याबरोबर चर्चा केली. दोन्ही देशांमधल्या राजनैतिक संबंधाचं यंदा 70 वं वर्ष आहे. पंतप्रधानांनी पोलंडमधील अनिवासी भारतीयांशी संवाद साधला; तसंच भारत पोलंड यांच्यातल्या महायुद्ध काळातल्या संबंधांनाही उजाळा दिला. पोलंडमधल्या कोल्हापूर स्मारकाला भेट देत त्यांनी आदरांजली अर्पण केली. दुसऱ्या महायुद्धात पोलंडच्या 5 हजार निर्वासित नागरिकांना कोल्हापूर संस्थानाने आश्रय दिला होता. त्याबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पोलंडमध्ये हे स्मारक बांधण्यात आलं आहे. या संदर्भात मराठीतून आपल्या भावना व्यक्त करताना पंतप्रधान म्हणाले..

बाइट – मोदी

**लखपती दीदी**

राज्यात जळगाव इथं येत्या रविवारी होणाऱ्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 11 लाख लखपती दीदींना प्रमाणपत्रांचं प्रतीकात्मक वितरण करण्यात येणार आहे. यावेळी ते त्यांच्याशी संवादही साधणार आहेत, अशी माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल नवी दिल्ली

इथं पत्रकार परिषदेत दिली.  याच कार्यक्रमात पंतप्रधान 2 हजार 500 कोटी रुपयांचा 'सामुदायिक गुंतवणूक निधी' हा पुनरावर्ती निधीही जारी करणार आहेत. 4 लाखांहून अधिक बचत गटांच्या जवळपास 48 लाख सदस्यांना या निधीचा लाभ होईल. पंतप्रधान 5 हजार कोटी रुपयांच्या बँक कर्जांचं वितरणही करणार आहेत. देशभरातील विविध जिल्हा मुख्यालयं दूरस्थ प्रणालीच्या माध्यमातून या कार्यक्रमामध्ये सहभागी होणार आहेत.

**पुरस्कार**

विज्ञान क्षेत्रातील योगदानासाठी दिले जाणारे यंदाचे 'राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार' राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात प्रदान केले. प्राध्यापक गोविंदराजन पद्मनाभन यांना यावेळी 'विज्ञानरत्न 2024' पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. राज्यातल्या अनेक शास्त्रज्ञांनाही काल राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित करण्यात आलं.

**बदलापूर हायकोर्ट**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर इथं दोन लहान मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी कोणती पावलं उचलण्यात आली आहेत, शालेय मुलामुलींच्या सुरक्षिततेसाठी कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत, याची सविस्तर माहिती देणारं प्रतिज्ञापत्र सादर करावं असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं काल राज्य सरकारला दिले. तसंच या गुन्ह्याची पोलिसांना माहिती न दिल्याबद्दल संबंधित शाळेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, त्याचबरोबर दुसऱ्या पीडित मुलीचा जवाब नोंदवून घेण्यास झालेल्या विलंबाबद्दल स्पष्टीकरण द्यावं असेही निर्देश राज्य सरकारला देण्यात आले आहेत. या प्रकरणाची स्वतःहून दखल घेत उच्च न्यायालयानं काल या प्रकरणाच्या सुनावणीला सुरुवात केली. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठासमोर काल या प्रकरणी सुनावणी झाली. त्यावेळी या प्रकरणाच्या तपासातील दिरंगाईबद्दल न्यायालयानं महाराष्ट्र पोलिसांवर ताशेरे ओढले. शाळा प्रशासनानं या गुन्ह्याची वेळीच माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही याबद्दलही उच्च न्यायालयानं नाराजी व्यक्त केली.

**एमपीएससी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीनं यावर्षीची महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी संयुक्त पूर्व परीक्षा पुढे ढकलली आहे. एमपीएससीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ही परीक्षा येत्या रविवारी 25 तारखेला होणार होती, मात्र त्याच दिवशी बँक कर्मचारी निवड संस्थेची लिपिक भरती परीक्षा असल्यानं अनेक उमेदवारांची अडचण लक्षात घेऊन हे लक्षात घेऊन एमपीएससीनं परीक्षेच्या वेळापत्रकात बदल केला आहे. एमपीएससीच्या या परीक्षेची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल.

**पुरवणी परीक्षा निकाल**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं जुलै आणि ऑगस्टमध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षांचा ऑनलाईन निकाल आज दुपारी जाहीर होणार आहे. मंडळाच्या संकेतस्थळावर दुपारी एकनंतर हा निकाल पाहता येईल.

**अंतराळ दिन**

पहिला राष्ट्रीय अंतरिक्ष दिन आज देशभरात साजरा केला जाणार आहे. या निमित्तानं संपूर्ण देशभरात अनेक उपक्रमांच आयोजन करण्यात आलं आहे. लोणावळा इथल्या ॲडवोकेट बापूसाहेब भोंडे हायस्कूल आणि कल्पना चावला स्पेस ॲकॅडमीमध्ये आज एक हजार विद्यार्थी चांद्रयान तीन ची प्रतिकृती एकत्रितपणे साकारणार आहेत. चंद्रलोक या विषयावर आधारित प्रदर्शनही या शाळेत आजपासून 28 ऑगस्ट या कालावधीत भरवलं जाणार आहे.  सकाळी नऊ ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ते सर्वांसाठी खुलं असेल.

**एमएमआर**

मुंबई महानगर आणि परिसर जागतिक आर्थिक केंद्र बनवण्यासाठी नीती आयोगानं केलेल्या अभ्यासाचा अहवाल काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द करण्यात आला. मुंबईचं सकल अंतर्गत उत्पादन पाच वर्षांत दुप्पट करण्यासाठी सात विविध क्षेत्रांवर निती आयोगानं लक्ष केंद्रीत केलं आहे. राज्याचा विकास, दळणवळण आणि संपर्कांच्या पायाभूत सुविधांवर अवलंबून असतो, त्याचदृष्टीने राज्यात कामं सुरू आहेत. उद्योजकांची देखील महाराष्ट्राला पसंती असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह अन्य संबंधित विभागांचे वरिष्ठ  अधिकारी उपस्थित होते. निती आयोगानं केलेल्या अभ्यासात मुंबई महानगरासह पालघर, रायगड, ठाणे या जिल्ह्यांचा समावेश असलेल्या परिसराच्या विकासाचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आलं आहे.

**मार्ड आश्वासन**

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या सुरक्षेचा सर्वंकष आढावा घेऊन त्यासाठी राज्य स्तरावर, तसंच मुंबईतील महाविद्यालयांसमवेत समन्वयासाठी पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्त करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काल प्रशासनाला दिले. निवासी डॉक्टरांच्या विविध मागण्यांबाबत मार्ड संघटना, तसंच मुंबई महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातील बीएमसी-मार्ड या संघटनेच्या प्रतिनिधींची मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवास स्थानी बैठक झाली. त्यानंतर दोन्ही संघटनांनी त्यांचा संप मागे घेत असल्याचं जाहीर केलं. शुक्रवारी म्हणजे

आज रक्तदान शिबिरात रक्तदान करून हा संप मागे घेणार असल्याचं संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितलं.

**चहल नियुक्ती**

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल यांची राज्याच्या गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव पदी बदली करण्यात आली आहे. चहल यांनी त्यांच्या सध्याच्या पदाचा कार्यभार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून, नवीन पदाचा कार्यभार मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून त्वरीत स्वीकारण्याचे निर्देश नियुक्ती संदर्भातील आदेशात देण्यात आले आहेत.

**अंध जन कार्यक्रम**

मुंबईतील अंधजन मंडल संस्थेतर्फे, अंध व्यक्तींसाठी उद्या 'रेशीमबंध' या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. सुमारे 150 अंध व्यक्ति या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाअंतर्गत गायन स्पर्धा तसंच अंधांसाठीच्या विविध तांत्रिक उपकरणांची प्रात्यक्षिकं आयोजित करण्यात आली आहेत.

**पोर्शे**

पुण्यातील कल्याणीनगर वाहन अपघात प्रकरणात रक्ताचे नमुने बदलल्या प्रकरणी सहा जणांचा जमीन पुणे सत्र न्यायालयाने काल फेटाळला. विशाल अगरवाल, शिवानी अगरवाल, डॉ अजय तावरे, डॉ श्रीहरी हळनोर, अशपाक मकांदर आणि अमर गायकवाड यांचा जामीन फेटाळला असल्याची माहिती सरकारी वकील शिशिर हिरे यांनी दिली.

**हवामान**

राज्यात येत्या 24 तासात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**